# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**०८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.२५.०४.२०२५**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (१९/०४/२०२५ ते २५/०४/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ४.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३७.८ | ३६.० | ३६.७ | ३७.५ | ३९.२ | ३९.० | ३७.० | कमाल तापमान (अं.से.) | ३८ | ३७ | ३७ | ३८ | ३९ |
| २१.२ | २०.० | २०.० | २०.८ | २०.४ | २१.६ | २२.० | किमान तापमान (अं.से.) | २२ | २१ | २१ | २१ | २२ |
| अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | निरभ्र | अ: ढगाळ | अ: ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | निरभ्र | निरभ्र |
| ८० | ८४ | ७१ | ६२ | ६४ | ८४ | ७७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ४८ | ४७ | ४८ | ४९ |
| ३३ | ३३ | ३१ | ३२ | ३४ | ३८ | ३४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २४ | २५ | २६ | २५ | २६ |
| ४.७ | ४.४ | ४.३ | ४.२ | ३.९ | ३.४ | ३.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ७ | ७ | ९ | ११ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता दि. २६ एप्रिल २०२५ रोजी नाशिक जिल्ह्याच्या घाट क्षेत्रात हलका किंवा मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे व उर्वरित दिवस हवामान उष्ण व कोरडे राहील. आकाश पुढील तीन दिवस अ: ढगाळ राहील तसेच उर्वरित दिवस निरभ्र राहील. तसेच कमाल तापमान ३७-३९ डिग्री सें. व किमान तापमान २१-२२ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ७-११ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | **हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत व मेघगर्जनेसह पाऊस साठी दामिनी मोबाईल ॲपचा उपयोग करावा.**<br>वेलवर्गीय भाजीपाला पिके<br>वेल सुकणे<br>वेलवर्गीय भाजीपाला पिके फळवाढीच्या संवेदनशील अवस्थ्येमध्ये असताना असंतुलित अन्नद्रव्य व सिंचनाचे व्यवस्थापन, वातावरणाचा ताण यांमुळे मर रोगकारक बुरशीच्या प्रादुर्भावाला सहजपणे बळी पडतात. परिणामी वेल पिवळे पडतात व वाळून जातात.<br>मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, कार्बेडाझिम (५० डब्ल्यूपी) किंवा थायोफेनेट मिथाईल (७० डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणाची प्रतिझाड ५० ते १०० मिली याप्रमाणे आळवणी (ड्रेंचिंग) करावी. |
| **संदेश** | | **दि. २६ एप्रिल २०२५ रोजी घाट क्षेत्रात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता सल्ला देण्यात येतो कि पशुधनाचे व स्वतःचे संरक्षण करा.** |
| **उन्हाळी बाजरी** | **फुलोरा अवस्था** | उष्ण हवामानाचा अंदाज लक्ष्यात घेता फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या बाजरी पिकाला पाण्याची तिसरी पाळी ६० ते ६५ दिवसांनी द्यावी.<br>अन्नद्रव्यांचा फवारणीद्वारे वापर<br>पेरणीनंतर ६० आणि ७५ दिवसांनी पिकावर डी.ए.पी. (१८-४६-०) किंवा १९-१९-१९ या विद्राव्य खताच्या दोन टक्के द्रावणाची (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारणी करावी. यामुळे उत्पादनात वाढ होते. |
| **उन्हाळी भुईमुग** | **आऱ्या उतरण्याची ते शेंगा लागण्याची अवस्था** | तुषार सिंचनाचा वापर<br>तुषार सिंचन पद्धतीची सिंचन कार्यक्षमता ८०-८२ टक्के इतकी आहे. तसेच ३०-३५ टक्के पाणी बचत आणि १५ ते २० टक्के उत्पादनात वाढ होते. तुषार सिंचनाने पिकाभोवती सूक्ष्म वातावरण निर्मिती होऊन पीक जोमदार वाढते. जमीन भुसभुशीत व वाफसा स्थितीत राहिल्याने आऱ्या लागण्याचे व पोसण्याचे प्रमाण वाढते. पिकाची वाढ निरोगी होते. रोग-किडींचा प्रादुर्भाव कमी होतो, त्यामुळे पाल्याची प्रत सुधारल्याने उत्तम प्रतीचा चारा मिळतो.<br>या पद्धतीत दोन नोझलमध्ये साधारणपणे १२ x १२ मीटर अंतर ठेवावे. यासाठी २ ते ३.५ कि.ग्रॅम /चौ.मी. इतका दाब आवश्यक आहे. तर पाणीफवारणीचा वेग साधारण ताशी १.५ ते २ सें.मी. इतका असतो.<br>तुषार सिंचन पद्धतीने पाणी देताना तुषार संचाचा पाणी देण्याचा, मुरण्याचा वेग साधारणपणे १.५-२.० सें.मी. तास इतका असतो. हे विचारात घेऊन साधारणपणे ५० मिमी (५ सें.मी) बाष्पीभवन झाल्यानंतर ५ सें.मी खोलीचे पाणी देण्यासाठी संच दोन ते तीन तास चालवावा.<br>गादीवाफ्यावर भुईमूग लागवड किंवा प्लॅस्टिक आच्छादनावर भुईमूग लागवड असेल, तर तुषार सिंचन पद्धत अधिक फायदेशीर ठरते. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **रब्बी ज्वारी** | **साठवणूक** | धान्य उफणनी करून तयार झाल्यानंतर, त्याला साठवणुकीपूर्वी पुन्हा उन्हात वाळवावे. साधारणतपणे ५० किलोची पोती भरून ठेवल्यास, पुढे बाजारपेठेत विक्री करणे सोपे जाते. |
| **गहू** | **साठवणूक** | साठवण<br>साठवणूकीच्या काळात गव्हामध्ये किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यात ओलाव्याचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा कमी ठेवावे. त्यासाठी मळणीनंतर गव्हास तीन ते चार दिवस चांगले ऊन द्यावे. त्यानंतर गहू थंड होऊ द्यावा. त्यानंतर साठवण करावी. शिफारस केलेल्या रसायनांचा तज्ज्ञांच्या सल्ल्याने बंद कोठीत वापर करावा. गहू साठविण्यासाठी ओलावा, उंदीर, पक्षी आणि अस्वच्छतेपासून मुक्त अशा सुरक्षित जागेची निवड करावी. गहू साठवण्यासाठी धातूच्या पत्र्यापासून अथवा सिमेंटपासून बनवलेल्या सुधारित कोठीचा वापर करावा. पोती स्वच्छ साफ करूनच त्यात धान्य भरावे. पोती लाकडी फळ्या अथवा पॉलिथीनच्या शीटवर ठेवावीत. |
| **खरीप भात, नाचणी व खुरासणी ई. पिके** | **पूर्व मशागत** | खरीप भात, नाचणी व खुरासणी ई. पिकांकरिता शेतीची नांगरट करणे, कुळवणी करणे व शेतातील धसकटे वेचणे. |
| **द्राक्षे** | | खरड छाटणी<br>खरड छाटणी म्हणजे ओलांड्यावर असलेली काडी तळातून छाटणे होय. या वेळी ओलांड्यावर असलेली काडी एक डोळा राखून छाटावी. ज्या बागेत ओलांडा पूर्णपणे तयार झालेला नाही, तिथे ओलांड्याच्या शेवटी निघालेली काडी तारेवर वाकवून बांधून पाच ते सहा डोळ्यावर छाटणी घ्यावी. जुन्या बागेत ओलांडा जास्त प्रमाणात डागाळला असल्यास त्या परिस्थितीत पूर्ण ओलांडा कापून घेता येईल. मागील हंगामातील काडी नवीन ओलांडा म्हणून वापरता येईल. अशा वेळी पाच ते सहा डोळ्यावर काडी कापून घ्यावी. बऱ्याचशा बागेत फुटी मागेपुढे निघण्याची समस्या दिसून येते. नेमकी खरडछाटणीवेळी झालेली चूक पुढे महागात पडू शकते. तेव्हा ओलांड्यावर फक्त एक डोळा राखून छाटणी घ्यावी.<br>एक सारखे व लवकर डोळे फुटण्यासाठी या वेळी हायड्रोजन सायनामाइडचा वापर महत्त्वाचा असतो. या रसायनाचा वापर जरी केला नाही, तरी डोळे मागे पुढे फुटतात. साधारणतः २० ते २५ मिली हायड्रोजन सायनामाइड प्रति लिटर पाणी या प्रमाणात वापर करता येईल. नवीन ओलांडा तयार करतेवेळी हायड्रोजन सायनामाइडचा वापर नवीन काडीवर करणे टाळावे. या वेळी केवळ जुन्या ओलांड्यावर हायड्रोजन सायनामाइडचे पेस्टिंग करावे. |
| **डाळिंब** | | मृग बहार/ अर्ली मृग बहार (जून-जुलै फूलधारणा)<br>बागेची सध्याची अवस्था - विश्रांती/ ताण अवस्था<br>ताणावर असलेल्या झाडांना फळ तोडणी संपल्यावर आणि जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये मुख्य छाटणी झाल्यानंतर खतांची मात्रा दिलेली असेल. ही मात्रा लागू होण्यासाठी हलके पाणी द्यावे.<br>बहार धरण्यापूर्वी १-२ महिने (जमिनीच्या प्रकारानुसार) पाणी बंद ठेवावे.<br>प्रत्येक १५ दिवसानंतर बोर्डो मिश्रण (१ टक्के) या प्रमाणे फवारणी घ्यावी.<br>फळ तोडणीनंतर झाडाच्या खोडाना गेरू किंवा लाल मातीची पेस्ट तयार करून जमिनीपासून दीड ते दोन फूट अंतरापर्यंत व्यवस्थितरित्या लावावी.<br>पेस्टसाठी प्रमाण - गेरू/ लाल माती ४ किलो अधिक क्लोरपायरीफॉस (२० ईसी) २० मिली अधिक कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २५ ग्रॅम अधिक १० लीटर पाणी. |
| **आंबा** | | निर्यातक्षम आंबा उत्पादनाकरिता शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी:<br>निर्यातक्षम आंबा बागेची नोंदणी संबंधित जिल्हा कृषि अधिकारी कार्यालयामार्फत विहित मुदतीत करून घ्यावी.<br>नोंदणीकृत आंबा बागेमध्ये किडी व रोगांचे नियंत्रण करण्याकरिता वापर करण्यात आलेल्या पीक संरक्षण औषधांचा अभिलेख ठेवणे तसेच कीड व रोगांचे नियंत्रणाकरिता लेबल क्लेम औषधांचा वापर करणे.<br>फळमाशी ही प्लांट क्वारंटाईन पेस्ट असल्याने तिच्या नियंत्रणाकरिता कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने फेरोमन ट्रॅपचा वापर करून फळमाशीच्या नियंत्रणाकरिता शिफारस केलेल्या लेबल क्लेम औषधांचा वापर करून नियंत्रण करणे.<br>आंबा फळाचा दर्जा हा वजन, आकार, रंग यावर ठरविला जात असल्याने अशा दर्जाची फळे जास्तीत जास्त उत्पादन करण्यावर लक्ष केंद्रित करणे. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **टोमॅटो** | | <u>विषाणूजन्य रोगांचे लागवडीनंतरचे व्यवस्थापन</u><br>लागवडीवेळी वाफ्यावर आच्छादनासाठी पांढरा, पिवळा, चंदेरी-काळा किंवा निळ्या रंगाच्या प्लॅस्टिक पेपरचा वापर करावा.<br>विषाणूजन्य रोगांचा प्रसार काही तणे, फुलझाडांमार्फत होत असल्याने टोमॅटो पीक तसेच बांध तणविरहित व स्वच्छ ठेवावेत.<br>रोगाची लक्षणे दिसताच रोगग्रस्त झाडे, फळे काढून जाळून नष्ट करावीत.<br><u>जैविक नियंत्रण</u><br>फळधारणेनंतर जैविक कीडनाशकांचा वापर करावा.<br>टोमॅटो, मिरची, ढोबळी मिरची, वांगी, गाजर, काकडी, खरबूज, कलिंगड, भुईमूग, बटाटा, उडीद, सोयाबीन, मूग, पपई, कापूस, भोपळा, केळी, बीट, पालक ही टोमॅटो पिकातील विषाणूजन्य रोगांची यजमान पिके आहेत. या पिकांत विषाणूजन्य रोगांची लागण झाली असल्यास, अशी रोगग्रस्त झाडे उपटून त्यांचा नायनाट करावा.<br>टोमॅटोची शेवटची तोडणी होताच संपूर्ण पीक काढून नष्ट करावे. पीक तसेच काही दिवस राहिल्यास रोगाचा प्रसार किडींद्वारे नव्या टोमॅटो पिकात होऊन प्रादुर्भाव वाढतो |
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | संकरीत गाईच्या बाबतीत तर उन्हाळयात विशेष काळजी घेणे गरजेचे आहे<br>जनावरांना गोठयामध्ये थंड जागी किंवा झाडाखाली बांधावे. गोठयाच्या छपरावर गवत, पाला पाचोळा टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहातो.<br>उन्हाळयामध्ये जनावरांना ३-४ वेळा थंड पाणी पाजावे.<br>आहारामध्ये वाढीव क्षार मिश्रणाचा वापर करावा.<br>जनावरांना उन्हाळयात दुपारच्या वेळेस चरण्यासाठी पाठवू नये.<br>गोठयामध्ये अधूनमधून पाणी फवारावे. रात्री व पहाटेच्या समयी वाळलेली वैरण भरपूर दयावी.<br>दुपारच्या प्रहरी हिरवी मका, चवळी, कडवळ, लसूण घास यासारखी पोषक वैरण दयावी. त्यामुळे दूध उत्पादनात सातत्य टिकून राहते व प्रजनन क्षमताही सुधारते.<br>जनावरांना चा-यांची कमतरता असल्यास गव्हाच्या काडावर तज्ञांच्या सल्ल्यानुसार युरीयाची प्रक्रिया करुन जनावरांना खाऊ घालावे. |
| **शेळी** | | <u>उन्हाळ्यातील शेळ्यांचे खाद्य व्यवस्थापन</u>: शेळ्यांकरिता दिल्या जाणाऱ्या दैनंदिन आहारात सकस हिरव्या चाऱ्याचा आविर्भाव असावा. प्रत्येक मोठ्या शेळीस ३ ते ५ किलोग्राम हिरवा चारा मिळेल असे नियोजन उन्हाळ्याआधीच करून ठेवावे. त्यासोबतच २०० ते ३०० चांगल्या प्रतीचे पशुखाद्यही पुरविण्यात यावे. हिरवा चारा कमी उपलब्ध असल्यास हिरवा-सुका चारा आणि पशुखाद्य सोबत मिसळून ओले मिश्रण तयार करून संमिश्र खाद्य दिल्यास त्यांचे खाद्य सेवन वाढते. चारा आणि पशुखाद्याचे प्रमाण हे ५०:५० असावे. उपलब्ध असलेला हिरवा चारा शेळ्यांना द्यावा. मांस वाढीसाठी आवश्यक घटक चाऱ्यातून मिळत नाहीत. त्यामुळे चाऱ्यामध्ये इतर घटक जसे क्षार मिश्रण, जीवसत्वे, प्रोबायोटिक्स यांचा वापर करावा. बंदिस्त शेळीपालनातील शेळ्यांना दिला जाणारा दैनंदिन आहार हा ३ ते ४ भागात विभागून सकाळी आणि सायंकाळच्या वेळी देण्यात यावा.<br>शेळ्यांना बुळकांडी रोगप्रतिबंधक लस या महिन्यात (एप्रिलमध्ये) टोचुन घ्यावी. |
| **कुक्कुटपालन** | | <u>उन्हाळ्यातील व्यवस्थापन</u><br>दिवसातून तीन-चार वेळेस छतावर पाण्याची फवारणी करावी. असे केले असता शेडमधील तापमान कमी होऊन कोंबड्यांना थंडावा मिळतो. शेडच्या एका बाजूला पोत्याचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडाव, जेणेकरून शेडमध्ये थंडपणा राहील व कोंबड्यांना उष्माघातापासून वाचविता येईल. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेडमध्ये ताजी हवा खेळती ठेवणे फार महत्त्वाचे आहे. हवा खेळती न राहिल्यामुळे शिळी व दूषित हवा पक्ष्यांच्या शेडमध्ये तयार होते व त्या हवेत अमोनिया, ओलसर कार्बन- डाय- ऑक्साईड व धुळीचा शिरकाव होतो व कोंबड्यांवर ताण येऊ शकतो. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : २५.०४.२०२५

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**